# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (0721) 257 7913


क्रमांक ;-विकाअ/शिक्षण/२०१८/333

महत्वाचे

दिनांक 0 2 FEB 2018

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय अनुदानित
व विना-अनुदानित तंत्रनिकेतनाच्या संस्था,
अमरावती. विभाग अमरावती.

विषयः- राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये सुरु करणे बाबत.

संदर्भ १. शासन निर्णय क्र संकीर्ण २०१०/१३२/२०१०)/सांशि-७ दि.०९/१२/२०१०

२. शासन पत्र क्र.रासेयो-२०१७/प्र.क्र.६८सांशि-७ दि.२१-०३-२०१७

३. मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुबई यांचे पत्र प्र.९(२)/रासेयो/२०१८/३१९ दि.११/०१/२०१८

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या वरील संदर्भीय पत्रानुसार शासनाने सुचित केलेले आहे की, राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व तंत्रनिकेतनांमध्ये सुरु करावी.(प्रत सलग्न)

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना ही १००% केंद्र पुरस्कृत योजना आहे. संदर्भीय शासन निर्णय क्र १ अन्वये सन २०१७-१८ पासून सदरहू योजना या संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित संस्थांमध्ये स्वखर्चाने म्हणजेच स्वयंनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना एकक (Self Finance Unit) सुर करण्यासाठी आदेशीत करण्यात येत आहे.सन २०१७-१८ या वर्षासाठी प्रत्येक संस्थेसाठी ५० विद्यार्थी संख्या व १ कार्यक्रम समन्वयक( संस्थेतील मंजूर अधिव्याख्याता)मंजूर करण्यात येत आहे. या बाबत मा.संचालकांचे प्रार्चायांना संबोधुन लिहिलेले पत्र सोबत जोडलेले आहे.सदर पत्र व योजनेशी संबधित शासन निर्णय व नियमावलीसह आपल्या कडे पाठविण्यात येते आहे. संस्थानी विद्यार्थी नांदणी संख्या व कार्यक्रम समन्वयकांची नावे याची माहिती विनाविलंब या कार्यालयास दि.०५/०२/२०१८ पर्यत नचुकता उलट टपाली सादर करावी सदर माहिती संचालनलयास तातडीने सादर करावयाची असल्याने आपण व्यक्तीशः लक्ष देऊन कार्यवाही करावी. याबाबत दिरंगाई झाल्यास आपणास जबाबदार समजण्यात यईल याची नोंद घ्यावी. तसेच सदरहू योजनेचे उल्लेखनिय कार्य करणा-या व क्रियाशील संस्थाना शासनाच्या परवानगीने सन २०१८-१९ पासून नियमित संस्था म्हणून या योजनेचे शासनकडून प्राप्त (अतिरिक्त)अनुदान वाटप व विद्यार्थी संख्या वाढ करण्यात यईल.

(डॉ.डी.व्ही.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

१) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेत स्थळावर टाकण्याकरीता.

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र . 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी : 2620601,2690602,2641150/51 फॅक्स : 2692102,269007
तार : EDUTECH E-mail:- desk9@dte.org.in Web:- http://www.dte.org.in

क्रमांक – 9(2)/रासेयो/2017/३५४
दिनांक – 10 JAN 2018

प्रति,
प्राचार्य

विषय - राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व **अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये** सुरु करणे..
संदर्भ - 1) शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/(132/2010)/साशि-7 दि.9-12-2010
2) शासन पत्र क्र.रासेयो-2017/प्र.क्र.68/साशि-7 दि.21-3-2017.

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या वरील संदर्भीय पत्रानुसार शासनाने सुचित केलेले आहे की, राष्ट्रीय सेवा योजना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालिल सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये सुरु करावी.

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना ही 100% केंद्र पुरस्कृत योजना आहे. संदर्भीय शासन निर्णय क्र.1 अन्वये सन 2017-18 पासून सदरहू योजना या संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित संस्थांमध्ये स्वखर्चाने म्हणजेच स्वयंनिर्वाह राष्ट्रीय सेवा योजना एकक (Self Finance Unit) सुरु करण्यासाठी आदेशीत करण्यात येत आहे. सन 2017-18 या वर्षासाठी प्रत्येक संस्थेसाठी 50 विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात येत आहे. या योजनेबाबतचे सर्व नियम व शासन निर्णय सोबत जोडले आहेत. सन 2017-18 या वर्षासाठी प्रत्येक संस्थेसाठी 50 विद्यार्थी संख्या व 1 कार्यक्रम समन्वयक(संस्थेतील मंजूर अधिव्याख्याता) मंजूर करण्यात येत आहे. सदरहू योजनेच्या प्रशिक्षणासाठी (कार्यक्रम समन्वयकांच्या) अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात यावे. सदरहू योजनचे उल्लेखनिय कार्य करणा-या व क्रियाशील संस्थांना शासनाच्या परवानगीने सन 2018-19 पासून नियमित संस्था म्हणून या योजनेचे अनुदान वाटप व विद्यार्थी संख्या वाढ करण्यात येईल.

(डॉ.अभय वाघ)
संचालक तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

सोबत - सबंधित शासन निर्णय व नियमावली